महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे "आयडॉल्स"

महात्मा फुले कृषि विद्यापीठ "कृषि पदवीधर आयडॉल"

श्री. दिलीप रामराव देशमुख

कृषि उद्योजक, बी.एस्सी. (कृषि), धुळे (१९७२),
एम. एस्सी. कृषि (उद्यानविद्या) जुनागड (१९७४)

संचालक, निर्मल सीड्स प्रा. लि., पाचोरा, जि. जळगाव

उद्योगामधील नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान

- निर्मल सीड्स प्रा. लि. कंपनीमध्ये वेगवेगळ्या पिकांच्या जाती/वाण विकसित करुन शेतकऱ्यांपर्यंत पोहचविणे
- नविन विकसीत वाणांचे बिजोत्पादन घेणे व शेतकऱ्यांना नविन विकसीत तंत्रज्ञान अवगत करणे
- ५० हजार शेतकऱ्यांपर्यंत तंत्रज्ञानाचे जाळे विकसीत केले असुन आणखी जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्याचा मानस
- एकूण ३५ पिकांमध्ये आतापर्यंत ४०० वाण प्रसारीत झाले आहेत. सध्या बाजारात जवळपास १७५ वाण आहेत
- भारतातील २२ राज्यांमध्ये निर्मल सीड्सचा विस्तार आहे.
- विद्यापीठाने प्रसारीत केलेल्या बाजरीच्या धनशक्ती या वाणाचा प्रसार केला

विविध पुरस्कारांनी सन्मानीत

- अखिल भारतीय ॲचिव्हर फाऊंडेशनचा औद्योगिक विकासासाठीचा भारतीय ॲचिव्हर पुरस्कार
- भारतीय एकता परिषदेचा मदर टेरेसा शिरोमणी पुरस्कार
- अखिल भारतीय व्यवसाय विकास संघटनेचा भारतीय विकास रत्न पुरस्कार

सामाजिक क्षेत्रातील योगदान

- आशिया पॅसिफीकमध्ये सहभाग
- अध्यक्ष, पाचोरा-भडगाव रोटरी क्लब
- अध्यक्ष, बहुउद्देशीय सहकारी विकास सोसायटी

आर्थिक प्रगती व रोजगार निर्मिती

- रु. २५१ कोटी
- ६१८ अधिकारी व कर्मचारी कार्यरत (अधिकाऱ्यांपैकी ५ आचार्य पदवीधारक व १४ एम. एस्सी. कृषि पदवीधारक)

महात्मा फुले कृषि विद्यापीठ "शेतकरी आयडॉल"

श्री. बाबासाहेब बन्सी सपकाळ
सौ. वैशाली बाबासाहेब सपकाळ

मु. पो. मानोरी, ता. राहुरी, जि. अहमदनगर (महाराष्ट्र)

जमीनधारण क्षेत्र : ०.४० हेक्टर

उल्लेखनीय कार्य

- पूर्वी शेतमजुर म्हणून काम केले, नंतर गोपालक म्हणून नाव मिळविले
- १ एकर क्षेत्रापैकी २० गुंठ्यामध्ये मुक्त गोठा, २० गुंठ्यामध्ये चारा उत्पादन
- मुक्तगोठा पध्दत संकल्पना यशस्वीपणे राबविली
- २६ संकरीत गायींपासून प्रतिदिन ४०० लि. वर्षभर दुध उत्पादनाचे नियोजन
- मुरघास तंत्रज्ञानाचा अवलंब करुन जनावरांसाठी लागणारा चारा विकत घेऊन त्यापासून कुट्टी करुन खड्डा पध्दतीने साठवणुक करुन वर्षभर लागणाऱ्या हिरव्या चाऱ्याचे व्यवस्थापन
- दुध काढणी यंत्राचा यशस्वी वापर
- उन्हाळ्यामध्ये तापमान नियंत्रणासाठी गोठ्यामध्ये तुषार सिंचनाचा यशस्वी वापर
- मुक्त गोठ्यामध्ये देशी कोंबडी पालनाव्दारे आर्थिक उत्पन्नात वाढ
- शेणापासून गोबरगॅस निर्मितीसाठी गोबरगॅस सयंत्र उभारणी व स्वयंपाकासाठी गॅसचा वापर

तंत्रज्ञानाचा प्रसार

- कृषि विभाग व कृषि विद्यापीठ यांचे मार्फत आयोजित केलेल्या विविध उपक्रमात सहभागी होऊन तंत्रज्ञानाचा प्रसार केला.
- विद्यापीठाने शिफारस केलेले मुरघास बनविण्याची पध्दत व दुध उत्पादन वाढविण्यासाठी तसेच दुध काढणी यंत्राचा वापर या आधुनिक तंत्राचा यशस्वीपणे अवलंब करुन इतर शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले.

वार्षिक उत्पन्न

- दररोजचे दुधसंकलन ४०० लि. रु. ४३ लाख दुधापासुन व रु. ७ लाख शेणखतापासुन असे एकूण रु. ५० लाखांची वार्षिक उलाढाल
- सर्व कामांसाठी कुटुंबातील सदस्यांचा सहभाग, कोणताही मजुर नाही

विविध पुरस्कारांनी सन्मानित

- ॲग्रोवन-दै. सकाळमध्ये दुग्ध व्यवसायाची यशोगाथा प्रसिध्द करुन सन्मानित केले

विस्तार शिक्षण संचालनालय, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मे, २०२२